# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर


**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address-sp office Bidco Road,Palghar west

E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६५८ दिनांक १९.०८.२०२०

**१. पालघर पोलीस ठाणे गु.रजि.क्र.I २१७/२०२० भा.द.वि.स. कलम -४२०,४०६ प्रमाणे,**

फिर्यादी महिला वय-३३ वर्षे, धंदा.खाजगी नोकरी (सिनियर ऑफीसर) रा.ता.जि. पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.२४/०७/२०२० रोजी ते १४/०८/२०२० रोजी पावेतो आरोपीत याने मराठी शादी डॉटकॉम वर त्यांची प्रोफाईल वर मेसेज पाठवून तसेच संपर्क साधून विवाह करण्यास इच्छूक असल्याचे सांगून ओळख केली आरोपीने तो फिर्यादी यांना भेटण्यास मुंबई येथे येण्याचे सांगून त्याने लगेचमध्ये तिच्यासाठी गिफ्ट कुरीयरने पाठवित असून त्याकरीता ३८,००० रुपये भरावे लागतील असे सांगितले त्यानंतर पुन्हा फिर्यादी यांना संपर्क साधून सदर लगेज मध्ये ५०,०००/- पौड सापडले असून त्याचे पॅनल्टी भरण्याकरीता ९७,०००/- रुपये भरण्यास विनंती केली तसेच पुन्हा सदर ५०,०००/-पौडचे रुपयाचे (भारतीय चलनामध्ये) रुपांतर करण्यासाठी २,४५,०००/- इतकी रक्कम भरावे लागेल असे सांगितले. आरोपीताने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन वेळोवेळी फिर्यादीस विविध कारणे सांगून फिर्यादी यांना विविध बँकेत पैसे भरण्यास सांगून एकुण ३,८०,०००/- रुपये इतकी फसवणुक केली आहे म्हणुन गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

पालघर जिल्हयातील सर्व नागरीकांना सायबर पोलीस पालघर यांचेकडुन आवाहन करण्यात येत आहे की अशा प्रकारच्या ऑनलाईन फसवणुकी पासुन सावध रहावे.

**२ वाडा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.१८३/२०२० भादविस कलम ३५३,३४१, २९१ ,२७०,२६९,१४३,१०९ साथीचारोग अधिनियम-१८९७ चे कलम-२,३,४ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१(ब), मुबंई पोलीस अधिनियम १९५१ कलम ३७,(१) (३), १३५ प्रमाणे**

फिर्यादी महीला पोलीस उपनिरीक्षक अलका नारायण करडे, नेम.वाडा पो.स्टे, यांनी फिर्याद दिली की, दि.१८/०८/२०२० रोजी १२-३० ते १३-४० वा.चे. सुमारास कुडुस एस.टीं.स्टॅड समोर, ता.वाडा, जि.पालघर येथे यातील एकुण १५० ते १७५ आरोपीत यांनी कोणाचीही पुर्व परवानगी न घेता वाडा-भिवंडी रोडवर पडलेल्या खड्डयाच्या संदर्भात रास्ता रोको आंदोलन करुन येणा-या-जाणा-या वाहनांना प्रतिबंध करुन आयशर टेम्पो व रिक्षा आडवी लावली म्हणुन पोलीसांनी त्यांना समजावुन सांगुन वाहतुक सुरळीत करीत असतांना पोलीसांच्या कामकाजात अडथळा आणुन सरकारी कामकाज बंद पाडुन मा.जिल्हाधिकारी सा़े,पालघर यांचा कोरोना प्रार्दुभाव वाढु नये व लोकांनी एकत्र येवु नये असा मनाई आदेश काढुनही त्याबाबत पोलीसांनी वांरवार सांगुनही एकत्र जमुन गर्दी करुन कोरोना प्रार्दुभावाबाबत

सामाजिक अंतर न ठेवता कोरोना प्रार्दुभावाचा ससंर्ग होईल हे माहीत असताना सुध्दा एकत्र जमुन साथीचा रोग व  कोराना प्रार्दुभाव ससंर्ग वाढविण्याचा प्रयत्न करुन आदेशाचा भंग केला म्हणुन गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे. सदर गुन्हयातील आरोपीत १) विरेंद्र ठाकरे  २)जयंत बिडवी , ३) मोहम्मद आगा , ४) प्रतीक पाटील, ५)विलास पाटील, ६) दिपक पाटील, ७) प्रमोद जाधव ८) कल्पेश ठाकरे ९) नितेश भोईर, १०) जयेश जाधव, ११) मयुर पाटील, १२) साईनाथ जाधव, १३) अविनाश जाधव या १३ आरोपीत यांना अटक करण्यात आली असुन दोन दिवस पोलीस कोठडी मंजुर करण्यात आली आहे.